रजिस्टर नं :- F 41921 (पुणे)
स्थापना :- २०१२-१३

"आत्मनिर्भर, सुसंस्कृत, व स्वाभिमानी समाजाच्या निर्मितिचे स्वप्न"

# ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था

रक्षालेखा सोसायटी इमारत क्र. सी-१/३, दत्तवाडी, पुणे - ४११०३०

संस्थापक/अध्यक्ष : सौ. ज्योती विलास पुंडे (कुलकर्णी)
(एम. एस. डब्ल्यू.) मो. नं. : ९८८१६६१०५३
email : dnyanjyoti19@yahoo.in

दर्भ क्रं.   दिनांक :

## संस्थेची माहिती

सुखी सारे असावेत, निरोगी ही सर्व तसे
सर्वांचे चांगले होवो, नसावे दुःख ते कोणा

आपणही समाजाचे देणे लागतो हीच सामाजिक जाणीव मनात रुजवून आम्ही २५ मार्च २०१२ रोजी ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेची स्थापना केली संस्थेच्या ध्येय उद्दिष्टानुसार अल्प काळातच विविध विषयांवर सामाजिक उपक्रम राबवून गरजवंतांपर्यंत पोहोचण्याचा अल्पसा प्रयत्न संस्थेच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत.

**संस्था पुढील प्रकल्पावर कार्यरत आहे.**

१. **कन्याशिक्षण जागर प्रकल्प :-** दुर्बल घटकांना शिक्षणाची जोड मिळाली तर पुढील पिढ्यांना नक्कीच मानाचे स्थान मिळेल त्यामुळे संस्थेने शैक्षणिक बाबींवर भर दिला आहे त्यानुसार शहरी वस्तीत राहणाऱ्या ५ वी ते १० वी पर्यंतच्या गरीब गरजू मुलींचे शैक्षणिक पालकत्व गेल्या ३ वर्षापासून लोक सहभागातून सुरु आहे. पालकवर्ग हा श्रमिकवर्ग असून मोलमजूरी करुन उदरनिर्वाहासाठी धडपड करीत असतात आर्थिक अडचणी अभावी मुलींना शिक्षण अर्ध्यावर सोडण्याची वेळ येते या 'सावित्रीच्या लेकीसाठी कन्याशिक्षण जागर' प्रकल्प संस्थेने हाती घेतला आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून संस्था मुलींची शैक्षणिक फी शालेय साहित्य, गणवेश, इ. साठी मदत करते. आमच्या या कार्यात सहभागी होऊन आपणही मदत देवू शकता गरीब, गरजू हुशार मुलींचे शैक्षणिक पालकत्व घेऊन संस्थेस मदत देऊ शकता.

२. **ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत :-** दरवर्षी ग्रामीण भागातील (भांबोरा) व आजुबाजूच्या परिसरातील शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते. शालोपयोगी उपक्रम करती प्रयोगशाळा प्रयोग दाखविणे अंधश्रध्दा निर्मुलन सी.डी. दाखविणे, तसेच अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांनाही मदत केली जाते.

**माणुसकीची उब :-** २०१६ सालापासून हा उपक्रम सुरु केला असून श्रमसंस्कृतीला प्रतिष्ठा मिळावी. समाजाला उपयुक्त सेवा देणारे कामगार हे श्रमसंस्कृतीची जपणूक करीत असतात समाजाच्या कृतज्ञतेचा प्रत्यय त्यांना लाभणे हे समाजसंपन्नतेचे लक्षण ठरते. या उपक्रमाअंतर्गत उसतोडणी कामगारांच्या कुटुंबियांना दरवर्षी २०० ते ३०० उबदार कपड्यांचे वाटप केले जाते.

रजिस्टर नं :- F 41921 (पुणे) स्थापना :- २०१२-१३

"आत्मनिर्भर, सुसंस्कृत, व स्वाभिमानी समाजाच्या निर्मितिचे स्वप्न"

# ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था

रक्षालेखा सोसायटी इमारत क्र. सी-१/३, दत्तवाडी, पुणे - ४११०३०

संस्थापक/अध्यक्ष : सौ. ज्योती विलास पुंडे (कुलकर्णी)
(एम. एस. डब्ल्यू.) मो. नं. : ९८८१६६९०५३
email : dnyanjyoti19@yahoo.in

संदर्भ क्रं. : दिनांक :

गरीब गरजू उपेक्षित घटकांपर्यंत पोहोचण्याचा संस्थेचा अल्पसा प्रयत्न आहे. तरी आपण आमच्या संस्थेला सढळ हाताने मदत देण्यासाठी सहकार्य करावे. आपल्या मदतीचा विनियोग नक्कीच चांगल्या कामासाठी होईल याची आम्ही आपणास ग्वाही देतो.

**संस्थेच्या भविष्यकालीन योजना :-**

१. महिला सबलीकरण उपक्रमांतर्गत गरजू महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र सुरु करणे. (ग्रामीण/शहरी)

२. ग्रामीण भागातील व शहरी वस्ती विभागातील युवकांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाचे मार्गदर्शन केंद्र सुरु करणे व व्यवसायासाठी अनुभव व्यक्तींचे मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करुन त्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

३. महिलांसाठी आरोग्यविषयक व्याख्याने शिबीराचे आयोजन करणे.

४. सामाजिक संस्थांसाठी उपयुक्त कार्यशाळांचे आयोजन करणे.

५. ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु करणे.

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, पुणे. |
| स्थापना दिनांक | : | २५ मार्च २०१२ रजिस्टर नं. : एफ ४१९२१ पुणे |
| संपर्क क्रमांक | : | ९८८१६६९०५३/८००७६११४६८ |
| ई-मेल | : | dnyanjyoti19@yahoo.in.com |
| संपर्क पत्ता | : | रक्षालेखा सोसायटी, इमारत क्र. सी-१/३ दत्तवाडी, पुणे ३०. |
| बँकेचा तपशील | : | ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था<br>A/C No. : 15320100012014<br>IFSC Code : BARB0LALBAH (Fifth character is Zero)<br>आपल्या मदतीचा धनादेश ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था या नावे दयावा. |
| प्रमाणपत्र | : | ८० जी मान्यताप्राप्त (आपण दिलेल्या देणगीस आयकरातून सूट मिळेल) |

ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था, पुणे.

संस्थापक/अध्यक्ष सचिव

सकाळ कार्यालय : रक्ताचा कर्करोग झाल्याने आरोग्य आणि परिस्थितीशी झगडणाऱ्या 'अश्विनी' या विद्यार्थिनीस टिंबर मार्केट येथील जैन युवक मंडळाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली.

# अश्विनीच्या संघर्षाला जैन युवकांचा आधार

बातमीचा परिणाम

**पुणे, ता. ७ :** 'रक्ताच्या कर्करोगासोबतच अश्विनीची परिस्थितीशी झुंज' ही बातमी 'सकाळ'च्या २ सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाली अन् मदतीचे हात पुढे सरसावले. टिंबर मार्केट जैन युवक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी लगबगीने अश्विनीसाठी १ लाख १ हजार रुपये संकलित केले. ही मदत स्वीकारण्यासाठी मंगळवारी अश्विनी व तिचे कुटुंबीय 'सकाळ'च्या कार्यालयात आले होते. दातृत्वाचा हा आधार पाहून अश्विनीच्या कुटुंबीयांना अश्रू आवरता आले नाहीत.

पुण्यातील ज्ञानज्योती बहुद्देशीय संस्थेच्या संस्थापिका ज्योती पुंडे यांच्याशी संपर्क करून अश्विनीच्या वडिलांनी उपचारांसाठी आर्थिक मदतीची गरज असल्याचे सांगितले. पुंडे यांनी अश्विनीचा संघर्ष 'सकाळ'पर्यंत पोचवला.

'सकाळ'मधील बातमी वाचून जैन युवक मंडळाने अश्विनीच्या पालकांशी संपर्क केला. मंडळाने पर्युषण पर्वाचे औचित्य साधून चोवियार घर या धार्मिक कार्यक्रमात अश्विनीला मदत करण्याचे समाजबांधवांना आवाहन केले अन् पैसे गोळा झाले.

मंडळाचे सदस्य रणजित परमार, उमेश ओसवाल, मयूर जैन, पंकज ओसवाल, ललित जैन, हसमुख ओसवाल, नितीन जैन, नीलेश भंडारी, पारस जैन, शीतल ओसवाल, सुकेश गुंदेशा, राकेश खिंवसरा यांनी यासाठी पुढाकार घेतला.

''अश्विनीच्या संघर्षाची बातमी 'सकाळ'मध्ये प्रसिद्ध झाल्याने आम्हाला तिच्या परिस्थितीबाबत खात्री पटली व तिला मदत करण्याचा निर्णय घेतला,'' अशी भावना मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.



'ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थे'तर्फे कर्जत तालुक्यातील तीनशे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देण्यात आले.

# शैक्षणिक साहित्याचे वाटप

पुणे : गुरुपौर्णिमेनिमित्त 'ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थे'तर्फे कर्जत तालुक्यातील भांबोरा दत्तनगर अंबिकानगर या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देण्यात आले. 'बारामती अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट'च्या विश्वस्त सुनंदा पवार यांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या मार्गदर्शक सल्लागार इरावती मोडक, जयश्री विसाळ, उषा शारंगपाणी, सरपंच माधुरी लोंढे, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. संस्थापक अध्यक्ष ज्योती पुंडे यांनी प्रास्ताविक केले. अमर खुडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. गेल्या सात वर्षांपासून भांबोरे आणि परिसरातील शाळांना 'ज्ञानज्योती'तर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येत आहे.



ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेतर्फे नगर येथील ऊसतोडणी मजुरांच्या मुलांना रजईचे वाटप करण्यात आले.

# ऊसतोडणी मजुरांच्या मुलांना रजईचे वाटप

**पुणे :** पुण्यातील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेतर्फे नगर येथील ऊसतोडणी मजुरांच्या मुलांना थंडीपासून संरक्षणासाठी रजईचे वाटप करण्यात आले. अंबालिका साखर कारखान्याच्या आवारात झालेल्या या कार्यक्रमाला ऊस तोडणी कामगारांची दोनशे मुले उपस्थित होती.

कार्यक्रमाला ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष ज्योती पुंडे, इरावती मोडक, जयश्री विसाळ, उषा शारंगपाणी, 'अंबालिका'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश तावरे, सुरेश शिंदे, पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

पुंडे आणि त्यांचे सहकारी गेल्या सात वर्षांपासून या कामगारांसाठी 'मायेची ऊब' हा उपक्रम राबवीत आहेत. 'ऊसतोडणी मजूर हा प्रचंड कष्ट करणारा वर्ग आहे. राबणाऱ्या हातांना आणि त्यांच्या कुटुंबास शक्य ती मदत करणे हे आपले कर्तव्य, सामाजिक जबाबदारी आहे. या मजुरांची मुले शिक्षण घेऊन मुख्य प्रवाहात यावीत, याच उद्देशातून आम्ही 'मायेची ऊब' हा उपक्रम राबवित आहोत,' असे मत पुंडे यांनी व्यक्त केले.

CMK

# थोडक्यात

## आगरकर शाळेत गणवेशाचे वाटप

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'ज्ञानज्योती' संस्थेतर्फे मुलींचे आगरकर हायस्कूल सोमवार पेठ, पुणे येथे गरजू कुटुंबातील विद्यार्थिनींना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. या वेळी 'महिला गृह उद्योग लिज्जत पापड'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश, सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, इरावती मोडक, संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष ज्योती पुंडे उपस्थित होत्या. पुंडे यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.